लोकमत पृ.पा.१

## क्षितिज ठाकूर यांच्यावर दोन गुन्हे दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विधानसभा निवडणुकीच्या काही तास आधी विवांता हॉटेलमध्ये पैसे वाटप प्रकरणी आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी उपस्थित भाजप व बविआ या दोन्ही राजकीय पक्षांविरोधात निवडणूक आयोगाने गुन्हे दाखल केले आहेत. पैसे वाटपप्रकरणी या हॉटेलमध्ये हाणामारी व बेकायदेशीर पत्रकार परिषद घेतल्याप्रकरणी नालासोपाऱ्याचे आ. क्षितीज ठाकूर यांच्याविरोधात प्रथमच दोन विविध गुन्हे दाखल झालेले आहेत.

२००९ मध्ये नालासोपारा विधानसभा मतदारसंघातून आ. क्षितिज ठाकूर निवडून आले होते. मागील तीन टर्मपासून त्यांच्यावर एकही गुन्हा दाखल नसल्याचे त्यांच्या प्रतिज्ञापत्रातून स्पष्ट होते. शिंदे गटाचे तालुकाप्रमुख सुदेश चौधरी यांना क्षितिज व अन्य कार्यकर्ते मारहाण करीत असल्याची चित्रफीत समाज माध्यमांवर दिसून आली. त्यानंतर त्यांच्याविरोधात तुळींज पोलिस ठाण्यामध्ये मारहाणीचा गुन्हा दाखल झालेला आहे.

लोकमत पृ.पा.२

# यंदा मीरा-भाईंदरमध्ये वाढला मतदानाचा टक्का

## महायुती, महाआघाडी की अपक्ष उमेदवार जिंकणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघात यंदा मतदानाचा टक्का काहीसा वाढला आहे. त्यामुळे वाढलेल्या टक्क्यांचा फायदा सत्ताधारी महायुती, महाविकास आघाडी की अपक्ष उमेदवारास होणार हे २३ नोव्हेंबरच्या मतमोजणीत स्पष्ट होणार आहे.

मीरा-भाईंदर मतदारसंघात आ. गीता जैन या अपक्ष तर भाजपचे नरेंद्र मेहता आणि काँग्रेसचे मुझफ्फर हुसेन यांच्यात प्रमुख लढत आहे. एकूण ५ लाख १० हजार ८६२ मतदार आहेत. त्यात २ लाख ६७ हजार ७८५ पुरुष, २ लाख ४३ हजार ७२ महिला तर ५ अन्य मतदार आहेत. यंदाच्या निवडणुकीत ५१.७६ टक्के इतके मतदान झाले आहे.



मतदारांनी मतदानाचा हक्क बजावताना मागील वेळेपेक्षा जास्त मतदान केले आहे.

### २०१९ मध्ये ४८.४१ टक्के; यंदा ५१.७६ टक्के

२०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीत एकूण ४८.४१ टक्के इतके मतदान होऊन २ लाख ११ हजार ६३६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. गीता जैन यांना ७९ हजार ५७५, तर भाजपच्या मेहतांना ६४ हजार ४९ व काँग्रेसचे मुझफ्फर हुसेन यांना ५५ हजार ९३९ इतकी मते मिळाली होती. २०१९ सालच्या निवडणुकीच्या तुलनेत मीरा-भाईंदरमधील मतदारांची संख्या वाढली असून मतदानाची टक्केवारीही किंचित वाढली आहे. या वाढीव मतदानाचा फायदा कोणाला मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु.पा. १


कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली नाराजी

# मतदान संपायला अवघे तीन तास, तरी कर्मचाऱ्यांना नव्हता जेवणाचा घास

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर मतदारसंघात मतदान केंद्रातील कर्मचाऱ्यांसाठी महिला बचत गटामार्फत नाश्ता-जेवण दिले जाण्याचा प्रशासनाचा दावा खोटा असल्याचे समोर येत आहे. प्रत्यक्षात ठाण्याच्या एका केटरर्सने काम केल्याचा आरोप होत आहे, तर दुसरीकडे अनेक मतदान केंद्रांतील कर्मचाऱ्यांना दुपारी ३ वाजले तरी जेवण मिळाले नव्हते. यामुळे कर्मचाऱ्यांत नाराजी व्यक्त होत आहे.

मीरा-भाईंदर मतदारसंघातील ५०३ मतदान केंद्रांवर बुधवारी उत्साहात मतदान पार पडले. निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान केंद्रातील कर्मचारी एक दिवस आधीच साहित्यासह केंद्रावर पोहोचले होते. १९ नोव्हेंबर रोजीच्या रात्रीचे कर्मचाऱ्यांसाठीचे जेवण, मतदानाच्या दिवशी २० नोव्हेंबर रोजी सकाळचा नाश्ता आणि दुपारचे जेवण यासाठी महिला बचत गटांना काम दिले गेल्याचे सांगण्यात आले होते. एकूण ५०३ मतदान केंद्रांतील कर्मचाऱ्यांसाठी ही व्यवस्था केली गेली होती.



नाश्ता व जेवण महिला बचत गटांच्या महिलांमार्फत बनवून वितरित करणे अपेक्षित असताना जेवण मात्र केटरर्सच्या पुरुष कर्मचाऱ्यांनी बनवले.

## महापालिका उपायुक्तांनी स्वत: मेसेज करून दिले निर्देश

१. १९ नोव्हेंबरच्या रात्री मतदान केंद्रातील सुमारे २ हजार कर्मचाऱ्यांचे रात्रीचे जेवण तर मतदानाच्या दिवशी सुमारे ३ हजार ५०० अधिकारी-कर्मचारी यांचा सकाळचा नाश्ता व दुपारचे जेवण यासाठी नऊ महिला बचत गटांना काम दिले गेले होते; परंतु सदर कामाचे कार्यादेश आणि कोणत्या बचत गटास कोणकोणत्या भागातील मतदान केंद्रांचे नाश्ता-जेवणाचे काम दिले गेले, हे मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी कॉल न घेतल्याने समजू शकले नाही.

२. **नाश्ता व जेवण महिला बचत गटांच्या महिलांमार्फत बनवून वितरित करणे अपेक्षित असताना जेवण मात्र केटरर्सच्या पुरुष कर्मचाऱ्यांनी बनवले. बनवलेले जेवण हे केंद्रांवर वेळेवर पोहचणे आवश्यक असताना नियोजनाअभावी अनेक मतदान केंद्रात दुपारचे ३ वाजले तरी जेवण पोहोचले नव्हते.**

३. स्वत: महापालिका उपायुक्त कल्पिता पिंपळे या संबंधित व्हॉट्सअप ग्रुपमध्ये तशा सूचना करून जेवण लवकर पोहोचवा यासाठी निर्देश देत होत्या. जेवण उशिराने मिळाल्याने अनेक मतदान केंद्रातील कर्मचाऱ्यांना उपाशीपोटी काम करावे लागले. तर काहींनी जेवण चांगले नसल्याने खाल्लेच नाही, असा आरोपही केला गेला.

Scanned with OKEN Scanner

सामना पा. ६

# मालदीवमध्ये डांबलेल्या भाईंदरच्या तरुणाची पोलिसांनी केली सुटका



भाईदर, दि. २१ (सा. वा.) - मालदीव येथे नोकरीसाठी गेल्यानंतर तिथेच अडकून पडलेल्या भाईंदरमधील २४ वर्षीय तरुणाची पोलिसांनी सुखरूप सुटका केली आहे. हा तरुण आठ महिन्यांपूर्वी मालदीवमध्ये गेला होता. मात्र तिथे त्याला रिसॉर्टच्या मालकाने आणि व्यवस्थापकाने त्रास दिला. त्यामुळे तो पुन्हा हिंदुस्थानमध्ये येण्यासाठी निघाला असता त्यांनी त्याला डांबून ठेवले होते. हा प्रकार समजल्यानंतर त्याचे पालक चिंतेत होते. मात्र त्याची सुखरूप सुटका करण्यात मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयाच्या भरोसा सेलला यश आले आहे.

भाईंदरमध्ये राहणारा मन पारेख (२४) हा व्यवसायाने शेफ आहे. एजंटच्या माध्यमातून डिसेंबर २०२३ मध्ये नोकरीसाठी मालदीव येथील राहा रिसॉर्ट येथे गेला होता. दोन महिन्यांच्या नोकरीत मालदीव येथील रिसॉर्ट मालक व तेथील जनरल मॅनेजर यांनी त्याच्याकडून १८ ते २० तास सतत काम करून घेत होते व त्याला जेवणदेखील नित्कृष्ट दर्जाचे दिले जात होते. तेथील जेवणामुळे त्याला त्रास सुरू होऊन त्याची तब्येत दिवसेंदिवस ढासळत चालली होती. त्यामुळे पारेख याने नोकरीचा राजीनामा दिला. मात्र त्याला तेथून बाहेर जाण्यास मज्जाव करण्यात आला. त्याला हिंदुस्थानमध्ये आणण्यासाठी त्याची आई गेल्या सहा महिन्यांपासून पंतप्रधान कार्यालय, विदेश मंत्रालय, हिंदुस्थानी दूतावास येथे पत्रव्यवहार करत होत्या. गेल्या दोन महिन्यांपासून त्या मुख्यमंत्री कार्यालय येथे प्रत्यक्ष भेटून त्यांना सतत पत्रव्यवहार करत होत्या, परंतु कुठूनही त्यांना सकारात्मक उत्तर मिळाले नाही.

## भरोसा सेलची विशेष कामगिरी

शेवटी मीरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील भरोसा सेलकडे मन पारेख याच्या आईने भरोसा सेल येथे रिसॉर्ट मालकाविरोधात तक्रार केली. त्यानंतर पोलिसांच्या भरोसा सेलने हिंदुस्थानी दूतावासाशी संपर्क साधला असता त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानंतर मन पारेख यास १७ नोव्हेंबरला हिंदुस्थानमध्ये पाठविण्याची तयारी दाखवली. मन पारेख हा हिंदुस्थानमध्ये सुखरूप परत आला आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली भरोसा सेल कक्षाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री शिंदे, महिला पोलीस हवालदार भारती देशमुख, पोलीस शिपाई आफ्रिन जुनैदी, पूजा हांडे, अक्षय हासे, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान विजय घाडगे यांनी केली आहे.

---

पुण्यनगरी पा. २.

# रुग्णवाहिकेच्या अपघातात सहा वाहनांचे नुकसान

## मच्छी विक्रेती गंभीर जखमी ▮ पारोळ फाट्याजवळील घटना




▮ **वसई** : अंबाडी-शिरसाड मार्गावर पारोळ येथे गुरुवारी सकाळी १० वाजता रुग्णवाहिकेच्या चालकाचा गाडीवरील ताबा सुटून झालेल्या भीषण अपघातात सहा वाहनांचे नुकसान झाले, तर ७१ वर्षीय महिला जखमी झाली. या अपघातामुळे नागरिकांमध्ये खळबळ उडाली असून रुग्णवाहिका चालकांच्या प्रशिक्षणाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

जखमी महिलेचे नाव ज्युली जॉन लिली (रा. अर्नाळा) असे असून, त्या मच्छी विक्री करण्यासाठी त्या बसल्या असताना रुग्णवाहिकेने धडक दिली. या धडकेत त्या गंभीर जखमी झाल्या असून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

राकेश मढवी या रुग्णवाहिका चालकाने स्वतःच्या प्रकृतीची तपासणी करण्यासाठी पारोळ आरोग्य केंद्र गाठले होते. तपासणी करून शिरसाडकडे जात असताना पारोळ फाट्याजवळ चालकाचा रुग्णवाहिकेवरील ताबा सुटला. या अनियंत्रित रुग्णवाहिकेने प्रथम उभी असलेल्या इको वाहनाला धडक दिली. त्यानंतर चार रिक्षा व एका कारला धडक दिली. शेवटी मच्छी विक्री करणाऱ्या ज्युली यांच्या अंगावरून ही रुग्णवाहिका गेली. अपघाताच्या वेळी या ठिकाणी गर्दी कमी होती, त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. मात्र, सहा वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघातानंतर चालक राकेश मढवी घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना नागरिकांनी त्याला पकडून पोलिसांच्या हवाली केले. मांडवी पोलिसांनी रुग्णवाहिका चालकाला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

> रुग्णवाहिका चालवणाऱ्या चालकांचे पुरेसे प्रशिक्षण होते का? या अपघातामुळे रुग्णवाहिका चालकांच्या कौशल्य आणि सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना आवश्यक आहेत.


Scanned with OKEN Scanner

(पुण्यनगरी) पु. पा. ७.

# ईव्हीएम मशीनला तीन दलांचे सुरक्षा कवच

## मतमोजणी केंद्रांवर चोख सुरक्षा व्यवस्था

**। मीरारोड :** विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी बुधवारी संपली आहे. आता निकाल लागण्याची सर्वांना प्रतीक्षा लागली आहे. शनिवारी मतमोजणी होणार आहे. १४५ मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी भाईंदर पूर्वेच्या इंद्रलोक परिसरात स्व. प्रमोद महाजन सभागृह येथे होणार आहे. निवडणूक आयोगाने या सभागृहात स्ट्राँगरूम बनवली असून, त्यात ठिकाणी मतदान प्रक्रिया झाल्यानंतर ईव्हीएम मशीन व व्हीव्हीपॅट मशीन ठेवल्या आहेत. त्या स्ट्राँग रूमच्या बाहेर केंद्रीय राखीव पोलीस दलाची सुरक्षा तैनात आह. त्यानंतर गुजरात सशस्त्र पोलीस दल स्ट्राँगगार्ड पथक येणाऱ्या, जाणाऱ्या ठिकाणी बंदोबस्त आहे, तर महाराष्ट्र पोलीस दलाचाही बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तसेच जिथे मशीन ठेवल्या आहेत, तिथे सर्व



सीसीटीव्ही कॅमेरे लावून त्याचे थेट प्रक्षेपण बाहेर उमेदवारांचे प्रतिनिधी व पोलिसांना पाहाता येणार आहे.

विधानसभेच्या निवडणुकीचे मतदान झाल्यानंतर मतमोजणीची तयारी करण्यात येते. मतमोजणी तयारीसाठी वेळ लागतो. त्यामुळे तयारी करण्यासाठी काही दिवसांचा वेळ दिला जातो. महाराष्ट्रात यावेळी तयारी करण्यासाठी दोन दिवसांचा वेळ दिला आहे. शनिवारी मतमोजणी होणार आहे. मतमोजणीच्या मशीन ठेवल्यानंतर त्या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येतो. भाईंदर पूर्वेला ईव्हीएम मशीन व व्हीव्हीपॅट मशीन जिथे ठेवल्या आहेत, तिथे तीन रांगेत पोलीस सुरक्षा ठेवलेली आहे. तसेच ईव्हीएम मशीन ठेवलेल्या ठिकाणी चारही बाजूने तिसऱ्या डोळ्यांची (सीसीटीव्ही कॅमेरे) नजर आहे.

**मीरा-भाईंदर मतदारसंघाची मतमोजणी शनिवारी कशी करायची, यासाठी शुक्रवारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच त्याठिकाणी मोबाइल व इलेक्ट्रॉनिक गॅझेट यांना बंदी असणार आहे. स्ट्राँगरुमच्या सुरक्षेसाठी ७५ पेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले आहेत. मतमोजणीसाठी २१ टेबल असणार आहेत व ३ टेबल हे टपाली मतदानासाठी असून एकूण २४ फेऱ्या होणार आहेत.**

# नालासोपारा, वसईत बोगस मतदानाच्या तक्रारी

**। वसई :** वसई आणि नालासोपारा मतदारसंघात बोगस मतदान धाल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत. आपल्या नावावर अगोदरच मतदान झाल्याचे कळल्यामुळे अनेक मतदारांना रिकाम्या हाताने परतावे लागले आहे.१३३ वसई मतदारसंघातील केंद्रावर मतदानासाठी गेलेल्या तीन मतदारांचे मत त्यांच्या अनुपस्थितीत अगोदरच करण्यात आले होते. त्यामुळे संताप व्यक्त करत या तीन मतदारांनी तक्रार करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यासाठी चार तास ताटकळत बसावे लागल्यामुळे ना मतदान ना तक्रार करताच त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. अशीच परिस्थिती कायम राहिल्यास यापुढे मतदान करणार नाही, असा संताप त्यांनी व्यक्त केला. असाच प्रकार नालासोपारा मतदारसंघातही घडला. पूर्वेकडील मदर मेरी हायस्कूलमध्ये मतदानासाठी गेलेल्या एका मतदाराला आपले मत अगोदरच कोणीतरी दिल्याचे दिसून आले. त्यामुळे त्याने तक्रार नोंदवण्याचा प्रयत्न केला. तर त्याला तू अधिकृत मतदार आहेस का, अशी विचारणा करण्यात आली. त्यामुळे भिक नको, पण कुत्रा आवर, म्हणत त्याने मुकाट्याने घरचा रस्ता धरला. असे प्रकार घडल्याचे कळल्यावर धर्मसभेचे सचिव हृषिकेश वैद्य चिंता व्यक्त केली आहे.

मध्य रेल्वे
ट्रेन व्यवस्थापन प्रणालीकरिता सर्वसमावेशक एएमसी
विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एस अँण्ड टी), पहिला मजला, पार्सल कार्यालय इमारत, प्लॅटफॉर्म क्र. १३ च्या जवळ, मध्य रेल्वे, मुंबई सीएसएमटी -४०० ००१ हे भारताच्या राष्ट्रपतींकरिता व

# मीरा-भाईंदर विधानसभेसाठी ५१.७५ टक्के मतदान

**। मीरा रोड :** मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघात गेल्या निवडणुकीत ४९ टक्के मतदान झाले होते. यावेळी मतदानाच्या टक्केवारीत वाढ झाली आहे. मतदान करण्यासाठी सकाळी ७ पासून सुरुवात झाली. सकाळी थोडी गर्दी कमी होती. ९ नंतर अनेक ठिकाणी मतदान केंद्राबाहेर रांगा लागल्याने मतदारांमध्ये उत्साह दिसून आला. त्यामुळे मतदानाचा टक्का वाढला आहे. मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघात झालेल्या निवडणुकीत सायंकाळी ६ पर्यंत ५१.७५ टक्के मतदान झाले आहे. भाईंदर पश्चिमेला गीता जैन व नरेंद्र मेहता या दोन गटात वाद निर्माण झाला होता. ते वगळता मतदान शांततेत पार पडले.

मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघात पुरुष २ लाख ६७ हजार ७८५, महिला २ लाख ४३ हजार ७२ व इतर ५ असे एकूण ५ लाख १० हजार ८६२ मतदार आहेत. मतदारांमध्ये सकाळपासूनच उत्साह वाटत होता. काही भागात सकाळपासून गर्दी होती तर काही भागात सकाळी ९ नंतर गर्दी होण्यास सुरुवात झाली. सकाळी ७ ते ९ पर्यंत ७.२१ टक्के मतदान झाले होते. सकाळी ११ पर्यंत १८.०२ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर २९.९५ टक्के मतदान दुपारी १ पर्यंत मतदान झाले होते. त्यानंतर ३ पर्यंत ३९.१० टक्के मतदान झाले व ५ वाजेपर्यंत ४८. ३६ टक्के मतदान झाले. सायंकाळी ६ पर्यंत शहरात एकूण पुरुष १ लाख ३७ हजार ९२८, महिला १ लाख २६ हजार ४२६ इतर ० एकूण मतदान २ लाख ६४ हजार ३५४ एकूण ५१.७५ टक्के मतदान झाले आहे.

Scanned with OKEN Scanner

(पुण्यनगरी पु.पा.७

# एकाच उमेदवाराला पुन्हा संधी न मिळण्याचा इतिहास

## मीरा-भाईंदरमध्ये तिरंगी लढतीकडे लक्ष


नरेंद्र मेहता


गीता जैन


मुझफ्फर हुसैन

**तिन्ही उमेदवारांनी शेवटच्या आठवड्यात जोरदार प्रचार केला. ही निवडणूक तिन्ही उमेदवारांच्या राजकीय भवितव्यासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. मेहता यांनी केंद्रीय मंत्री, विविध राज्याचे मुख्यमंत्री, तसेच भाजपचे वरिष्ठ नेते प्रचारात उतरवले. तर दुसरीकडे हुसैन यांनी अत्यंत आक्रमकपणे प्रचार करून काँग्रेसचे नेते, अन्य राज्यातील आमदार प्रचारासाठी आणले. गीता जैनदेखील प्रचारात कुठेही कमी पडू नये, याची काळजी घेत त्यांनीही रॅली व सभा घेतल्या.**

। मीरा रोड । मीरा-भाईंदर मतदारसंघात एक आजी आणि दोन माजी आमदार एकमेकांसमोर निवडणूक लढवत आहेत. या निवडणुकीत तिघांचेही राजकीय भवितव्य पणाला लागले आहे. तीनही उमेदवार प्रचाराच्या अगदी शेवटच्या टप्प्यापर्यंत प्रचार करत होते. मीरा-भाईंदर मतदारसंघात विद्यमान अपक्ष आ. गीता जैन, भाजपचे माजी आ. नरेंद्र मेहता आणि दोन वेळा विधान परिषदेचे सदस्य राहिलेले काँग्रेसचे माजी आमदार सय्यद मुझफ्फर हुसैन यांच्यात तिरंगी लढत होणार आहे. मात्र खरी लढत नरेंद्र मेहता व सय्यद मुझफ्फर हुसैन यांच्यात होणार असल्याचे जाणकार सांगतात. दरम्यान, या मतदारसंघात एका उमेदवाराला पुन्हा संधी मतदारांनी दिलेली नाही.

१४५ मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघ २००९ साली नव्याने निर्माण झाला. २००९ मध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी असल्याने राष्ट्रवादीचे गिल्बर्ट मेंडोसा यांना उमेदवारी मिळाली. तर भाजप शिवसेनेची युती असल्याने भाजपकडून नरेंद्र मेहता यांना उमेदवारी मिळाली. या निवडणुकीत राष्ट्रवादीचे गिल्बर्ट मेन्डोसा हे विजयी झाले. तर २०१४च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे गिल्बर्ट मेन्डोसा व भाजपचे नरेंद्र मेहता यांच्यात लढत झाली. यात नरेंद्र मेहता विजयी झाले. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे नरेंद्र मेहता, काँग्रेसचे मुझफ्फर हुसैन व भाजपात बंडखोरी करून गीता जैन या अपक्ष म्हणून उभ्या होत्या. या निवडणुकीत गीता जैन यांनी विजय मिळवला. या मतदारसंघात एका उमेदवाराला पुन्हा संधी मतदारांनी दिलेली नाही.

अपक्ष आ. गीता जैन यांना निवडून दिल्यानंतर त्यांनी भाजपला पाठिंबा दिला. नंतर महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर त्यांनी शिवसेना ठाकरे गटाला समर्थन दिले. अडीच वर्षांनंतर सत्तांतर झाल्यानंतर त्यांनी शिवसेना शिंदे गटाला समर्थन दिले. जैन या एका ठिकाणी न राहिल्यामुळे नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू होती.

निवडणुका जाहीर होण्यापूर्वी त्या भाजपकडे उमेदवारी मागत होत्या. दुसरीकडे शिंदे यांच्यादेखील संपर्कात त्या होत्या. मी भाजपातच आहे. मलाच भाजपची उमेदवारी मिळणार, असे त्या सांगत होत्या. जैन यांनी एका दगडावर पाय न ठेवल्यामुळे त्यांना दोन्ही पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी अपक्ष निवडणूक लढवली आहे. परंतु गेल्यावेळी त्यांना अपक्ष म्हणून नागरिकांनी पाठिंबा दिला होता. तो यावेळी दिसला नाही. तसेच जैन यांनी पाच वर्षांत नागरिकांना दिसतील अशी कामे केली नसल्याचे नागरिक सांगत आहेत. यावेळी चुरशीची लढत भाजपचे नरेंद्र मेहता व काँग्रेसचे मुझफ्फर हुसैन यांच्यात होणार असल्याचे सांगितले जात आहे. मेहता यांचा गेल्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही ते सतत नागरिकांच्या संपर्कात आहेत. त्यामुळे नागरिकांचा त्यांना पाठिंबा मिळताना दिसला. तर मुझफ्फर हुसैन महाविकास आघाडीचे उमेदवार असल्यामुळे त्यांना काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट व शिवसेना ठाकरे गट यांचे मतदार मोठ्या प्रमाणात आहेत. तसेच शहरात हिंदू-मुस्लिम हा वादही विकोपास गेला होता. तसेच मुस्लिमांची मतदार संख्या जास्त आहे. मेहता व हुसैन यांच्यात चुरस होणार असल्याचा अंदाज आहे.

नवभारत पृ.प.3.

# मतदान करने में महिलाएं अव्वल


## 145 मीरा-भाईंदर विधानसभा : 0.5 प्रतिशत महिलाओं ने पुरुषों से अधिक किया मतदान

### जैन, नरेंद्र मेहता और मुजफ्फर हुसैन की प्रतिष्ठा दांव पर

विनोद मिश्रा@नवभारत

**भाईंदर.** 20 नवंबर बुधवार को संपन्न हुए सार्वजनिक चुनाव में 145 मीरा-भाईंदर विधानसभा सीट पर 51.75% मतदान हुआ. इस सीट पर मतदाताओं की कुल संख्या 5 लाख 10 हजार 862 है. इसमें से 1,37,928 पुरुषों और 1,26,426 महिलाओं ने अपने मताधिकार का उपयोग कर मतदान किया. पुरुष और महिला मतदाताओं की कुल संख्या के अनुसार पुरुषों की अपेक्षा महिलाओं ने 0.5% अधिक मतदान किया है, ऐसी जानकारी रिटर्निंग ऑफिसर सुनील भूताले ने दी है. इस चुनाव में मुख्य रूप से वर्तमान विधायक गीता जैन और पूर्व विधायक नरेंद्र मेहता तथा मुजफ्फर हुसैन की राजनीतिक प्रतिष्ठा दांव पर लगी हुई है, जिनके भाग्य का फैसला शनिवार 23 नवंबर को होगा. चुनाव के दौरान इन तीनों के बीच ही कांटे की टक्कर देखी गई. वैसे तो इस सीट पर 17 उम्मीदवारों ने अपना भाग्य आजमाया है, लेकिन उपरोक्त तीन उम्मीदवारों को छोड़ दें तो बाकी सब की भूमिका वोटकटवा के रूप में ही देखी गई. वोट काटने वाले उम्मीदवारों ने किसको फायदा पहुंचाया और किसे नुकसान, वो तो फिलहाल ईवीएम मशीन में कैद है. इस चुनाव के परिणाम का असर आगामी मनपा चुनाव पर भी पड़ना तय है, इसलिए जैन, मेहता और हुसैन के लिए यह चुनाव और भी अधिक महत्वपूर्ण हो गया है.





### कांग्रेस के लिए अस्तित्व की लड़ाई

मविआ गठबंधन से कांग्रेस की टिकट पर चुनाव लड़ने वाले मुजफ्फर हुसैन के लिए यह चुनाव अस्तित्व की लड़ाई के रूप में देखी जा रही है, क्योंकि विगत कुछ वर्षों में कांग्रेस मीरा-भाईंदर शहर के एक विशेष क्षेत्र नयानगर तक ही सिमटता नजर आ रहा है. इस चुनाव में कांग्रेस को शिवसेना (उद्धव) का साथ मिलने से पार्टी के विस्तार का एक अच्छा अवसर हुसैन को मिला है, जिसकी मदद से मनपा चुनाव में वे अपना दमखम दिखा सकेंगे, इसलिए यह चुनाव के परिणाम उनके लिए महत्वपूर्ण साबित होगा.

### गीता जैन के लिए राजनीतिक वजूद की लड़ाई

- विधायक गीता जैन के लिए यह चुनाव उनके राजनीतिक वजूद को टिकाए रखने की जद्दोजहद की लड़ाई है. महायुति सरकार के साथ होने के बावजूद उन्हें पार्टी का टिकट नहीं दिया गया.
- 2019 में भी भाजपा ने उन्हें किनारा कर नरेंद्र मेहता को टिकट दे दिया था, उस चुनाव में खुले आम शिवसेना (अविभाजित) ने जैन का समर्थन किया था और जैन चुनाव जीत गई थी.
- लेकिन इस चुनाव में विभाजित शिवसेना का कोई आशातीत समर्थन उन्हें नहीं मिला और उनके पास समर्पित कार्यकर्ताओं की कमी भी देखी गई. ऐसी परिस्थिति के बावजूद अगर जैन चुनाव जीत जाती हैं तो उनका राजनीतिक वजूद और कद बढ़ना तय माना जा रहा है.



### विस क्षेत्र में किया मतदान

| | |
|---|---|
| पुरुष | 51.51% |
| महिला | 52.01% |

(5,10,862 मतदाताओं की कुल संख्या)

| | |
|---|---|
| पुरुष | 1,37,928 |
| महिला | 1,26,426 |

### नरेंद्र मेहता के लिए कड़े इम्तिहान की घड़ी

यह चुनाव भाजपा उम्मीदवार नरेंद्र मेहता के लिए कड़े इम्तिहान की घड़ी है. पिछला चुनाव हारने के बाद भी पार्टी ने उन पर विश्वास जताया और उन्हें टिकट दी, इसलिए यह चुनाव उनके लिए 'करो या मरो' जैसी थी. इसके अलावा मेहता ने जिस तरह मनपा की सत्ता पर एकतरफा कब्जा कर 95 में से भाजपा के 61 पार्षद चुनकर लाए थे. इसी तरह आगामी मनपा चुनाव में सत्ता पर काबिज होने के लिए उन्हें विधानसभा का यह चुनाव जीतना महत्वपूर्ण हो गया है. अगर चुनाव परिणाम मेहता के पक्ष में आता है तो मनपा पर उनका दबदबा कायम रखने और स्थानीय भाजपा पार्टी पर भी उनकी पकड़ अबाधित रखने में सहायक सिद्ध होगी.

Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर पा.नं. 3.

# मालदीव के 'रिसॉर्ट' में शोषण का शिकार भायंदर के व्यक्ति को वापस भारत लाया गया

एजेंसी | भायंदर

भायंदर के रहने वाले एक व्यक्ति को मालदीव से भारत वापस लाया गया है। वह वहां एक रिसॉर्ट में शेफ के रूप में कार्य कर रहा था और शोषण तथा जबरन मजदूरी का शिकार हुआ था। पुलिस के एक अधिकारी ने गुरुवार को बताया कि मालदीव में भारतीय उच्चायोग के सहयोग से मीरा-भायंदर वसई-विरार पुलिस के 'भरोसा सेल' के प्रयासों से मान पारेख को उसके परिवार से मिलवाया गया।

सहायक पुलिस आयुक्त (अपराध) मदन बल्लाल ने बताया कि वह पिछले साल दिसंबर में एक 'रिसॉर्ट' में शेफ के तौर पर काम करने के लिए मालदीव गया था। उसकी नौकरी का प्रबंध एक स्थानीय एजेंट ने करवाया था। वहां जाकर व्यक्ति ने खुद को शोषण और अपमानजनक कार्य वाले माहौल में फंसा हुआ पाया। उसे प्रतिदिन लगभग 20 घंटे काम कराया जाता था और खराब गुणवत्ता का खाना दिया जाता था, जबकि अन्य सुविधाएं भी घटिया दी जाती थीं।



**भरोसा सेल से किया संपर्क:** एसीपी ने कहा कि उसके माता-पिता ने रिसॉर्ट के प्रबंधन से बातचीत करने की कोशिश की, लेकिन कोई फायदा नहीं हुआ। उन्होंने छह महीने में उसे वापस लाने के लिए कई तरीके आजमाए और अंत में 15 नवंबर को उन्होंने भरोसा सेल से संपर्क किया। सेल की वरिष्ठ निरीक्षक तेजश्री शिंदे ने वहां भारतीय उच्चायोग से संपर्क किया और अन्य औपचारिकताएं पूरी की, जिसके बाद 18 नवंबर को पारेख को भारत वापस भेज दिया गया।

N.B.T. पा.नं. 4.

# मां से मारपीट, बेटी से छेड़छाड़, केस दर्ज

■ निसं, नालासोपारा: रहमत नगर इलाके में दुकान में बैठी मां-बेटी के साथ चार लोगों ने मारपीट व छेड़छाड़ की है। महिला की शिकायत पर तुलिंज पुलिस ने विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज कर लिया है। जानकारी के अनुसार, 43 वर्षीय महिला ने आरोप लगाया कि मंगलवार की रात वह अपनी 16 वर्षीय बेटी के साथ दुकान पर बैठी थी। उसी समय शाहरुख खान और जावेद खान सामान खरीदने आए। जब उनकी बेटी ने पैसे मांगे, तो उन्होंने हाथ पकड़ लिया। जब दोनों ने इसका विरोध किया तो मारपीट की गई। कुछ देर बाद वहां दो महिलाएं आईं, उन्होंने भी मारपीट की। बुधवार को पुलिस स्टेशन में चारों के खिलाफ मारपीट व छेड़छाड़ का मामला दर्ज करवाया गया।


Scanned with OKEN Scanner

N.B.T. पा नं 4.

# हाइवे पर अतिक्रमण, 13 ब्लैक स्पॉट्स बन रहे हैं जानलेवा!

## मुंबई-अहमदाबाद हाइवे पर चिह्नित किए हैं ब्लैक स्पॉट





■ सुरेंद्र नेगी, वसई: मुंबई-अहमदाबाद हाइवे के कुछ चुनिंदा स्पॉट्स वाहनचालकों के लिए जानलेवा बनते जा रहे हैं। हाइवे पर अतिक्रमण की वजह से वाहन चलाना चुनौती का काम है। पिछले दो साल में इन स्पॉट्स पर हुए सड़क हादसों में अब तक 50 लोगों की जा चुकी है। हालांकि प्रशासन की ओर से तमाम उपाय किए गए हैं, लेकिन न तो अतिक्रमण की घटनाएं रुक पा रही हैं और न ही हादसों की रोकथाम हो पाई है। रोजाना सैकड़ों वाहनचालक हाइवे के अतिक्रमणों की सजा भुगत रहे हैं।

बता दें कि हाइवे पुलिस ने काशीमीरा से लेकर विरार फाटा के बीच 13 ब्लैक स्पॉट्स चिह्नित किए हैं। इनमें से अधिकतर ब्लैक स्पॉट्स के पास अवैध गैराज, होटल, ढाबे के साथ ही वाहनों की अवैध पार्किंग की जाती है। इससे सड़क हादसे बढ़ रहे हैं। पिछले दो साल में कई सड़क हादसे हुए हैं, जिनमें 50 लोगों ने जान गंवाई है। सबसे अधिक हादसे पेल्हार स्थित वांगणपाडा क्षेत्र में हुए हैं।

विरार फाटा से लेकर वर्सोवा खाड़ी ब्रिज तक हाइवे के दोनों ओर बड़े पैमाने पर अतिक्रमण हुआ है। एक तरफ जहां भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (एनएचएआई) की ओर से वाईट टैपिंग कार्य शुरू किया गया है, जो काफी धीमी गति से चल रहा है, तो दूसरी ओर 13 ब्लैक स्पॉट्स के पास किए गए अतिक्रमणों की वजह से भारी ट्रैफिक जाम लग रहा है। 2021 में हाइवे पुलिस ने काशीमीरा से लेकर विरार फाटा के बीच लगभग 30 किमी की दूरी पर 13 ब्लैक स्पॉट्स घोषित किए, जहां अक्सर हादसे होते हैं।

**"हाइवे पर ब्लैक स्पॉट वाली ज़गहों पर अवैध पार्किंग करने वालों पर हमारी ओर से कार्रवाई जारी है।"**

– पवन ठाकुर, सहायक पुलिस निरीक्षक हाइवे

**"अतिक्रमण हटाने के लिए हमने जिलाधिकारी, पुलिस और मनपा को पत्र दिया है, लेकिन कोई ऐक्शन नहीं लिया गया।"** – सुमित कुमार, एनएचएआई अधिकारी

### यहा होते है हर साल सड़क हादसे

हाइवे पुलिस ने दिल्ली दरबार, घोडबंदर घाट, किनारा ढाबा, दुर्गा माता मंदिर, रॉयल गार्डन, एचपी पेट्रोल पंप, लोढा धाम, बापाने ब्रिज, चिंचोटी ब्रिज, तुंगारेश्वर फाटा, गोल्डन चैरिट होटल, वसई फाटा, वांगनपाडा, पेल्हार सहित 13 स्पॉट चिन्हित किए थे। इन जगहों पर चेतावनी के बोर्ड लगाए गए थे। वाहनों की स्पीड कम करने के लिए रेडियम व रंबलर भी लगाए गए।

Scanned with OKEN Scanner

The Free Press Journal

MIRA BHAYANDAR

## Women trail men by 0.5%

The Mira Bhayandar assembly constituency recorded a voter turnout of 51.75% across 503 polling stations in the twin city by the conclusion of polling at 6:00pm on Wednesday. Of the total 5,10,862 registered voters, 2,64,354 exercised their franchise. Among them, 1,26,426 female voters participated, accounting for 52.01% of the total female electorate of 2,43,072. Out of the 2,67,785 registered male voters, 1,37,928 (51.51%) cast their votes, 0.5% higher than the female voters. Notably, none of the five registered voters from the transgender community participated in the election.

Hindustan Times

## CHEF EXPLOITED AT MALDIVES RESORT RETURNS

**Megha Sood**

megha.sood@hindustantimes.com

**MUMBAI:** A 24-year-old man from Bhayandar who was allegedly exploited and harassed while working as a chef at a resort in the Maldives for almost a year has returned to Mumbai after the Bharosa Cell of the Mira-Bhayandar Vasai-Virar police stepped in.

Mann Parikh's return follows a six-month-long effort by his mother, Gayatri Parikh, who ran from pillar to post to get the authorities to help bring her only son back from the Maldives, where he was allegedly being forced to work for over 20 hours at a stretch and not given decent food.

Mann, who had studied hotel management, left for the Maldives in December 2023 after getting a job as a chef at a resort. However, within weeks, he called his mother complaining that he was being exploited.

Mann's parents then pleaded with his employer to cancel his contract and allow him to return to Mumbai. They were also ready to pay out his contract, but the resort's owner, who had allegedly confiscated his passport, did not agree.

"I went to the police, Mantralaya, wrote to the Indian embassy in the Maldives and did whatever I could to get my son back. For six months, I begged people for my son's freedom, but nothing worked," said Gayatri Parikh.

On November 15, Parikh contacted the Bharosa Cell, which was set up to assist senior citizens, women, and children. "We heard Parikh and spoke to the owner of the resort, explaining that Mann was unhappy there and wanted to return to India. On November 17, eventually, the employer agreed to send Mann back," said police sub-inspector Tejashree Shinde from the Bharosa Cell.

Scanned with OKEN Scanner